| विशेष बाबी<br><br>ह : हमखास क : कधीकधी<br>ब : बहुधा उ : उशीरा | आजार<br><br>साधा आजार<br>मध्यम आजार<br>गंभीर आजार |
|---|---|
| नाकातून पाणी येणे, शिंका, डोळे लाल, कधीकधी ताप, डोके गच्च वाटते | सर्दी पडसे |
| विशेषतः विषाणूंचे आजार, लक्षणे : ताप, अंगदुखी इत्यादी | निरनिराळे विषाणू ताप |
| बहुधा दुपारनंतर डोके दुखते, विश्रांतीने थांबते. | मानसिक ताण थकवा. |
| नाकाच्या बाजूवर, भुवयांवर, डोळ्याखाली इत्यादीपैकी जागांवर दुखते. ठणका, नाकातून चिकट पिवळा शेंबूड. बहुधा ताप असतो. | सायनसदुखी |
| दिसण्यास त्रास, वाचतांना डोके दुखणे | दृष्टीदोष |
| डोक्याचा अर्धा भाग ठणकतो, बहुधा नेहमी येणारा आजार. | अर्धशिशी |
| डोके दुखते, मळमळते, उलटी झाल्यावर खूपदा बरे वाटते. दूपारपर्यंत डोकेदुखी वाढते नंतर कमी होते. | पित्ताची डोके दुखी (हा अर्धशिशीचाच प्रकार आहे.) |
| ठराविक कालावधीनंतर २-३ दिवस डोकेदुखीचा त्रास होतो. डोकेदुखी तासभर टिकते. दिवसातून २-३ वेळा डोकेदुखी येते. | चक्री डोकेदुखी |
| उपासमार, उपास यामुळे रक्तातील साखर कमी होऊन डोके दुखते, खाल्ल्यानंतर कमी होते. | भूक, उपासमार |
| जास्त ऊन, उष्णता (भट्टी इ.) खूप थंडी इत्यादींमुळे डोके दुखते | हवाबदलामुळे डोके दुखते |
| अचानक ताप, डोकेदुखी, उलट्या, झटके इत्यादी. मेंदू आवरणदाह असल्यास तपासणीत मान ताठरल्याची आढळते. | मेंदू आवरणदाह किंवा मेंदूसूज |
| रक्तदाबाचे प्रमाण अचानक वाढले किंवा कमी झाले तर डोके दुखते. रक्तदाब तपासा. | कमी किंवा जास्त रक्तदाब. |
| डोकेदुखी हा बऱ्याच प्रकारच्या औषधांचा एक दुष्परिणाम असतो. औषधांचा तक्ता पहा | औषधांचा दुष्परिणाम |
| डोक्यास इजा झाल्याची माहिती घ्या. कधीकधी पूर्वी मार लागल्यास आताही डोके दुखू शकते. | मेंदूस मार/इजा |
| चेतासंस्थेची विशिष्ट लक्षणे दिसतात. डोकेदुखी सतत असते. | मेंदूत गाठ |
| पोट साफ होत नसल्यास आतड्यातल्या विषारी कुजण्यामुळे डोके दुखते | बद्धकोष्ठाचा परिणाम. |